सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे ,(आपत्ती व्यवस्थापन शाखा)

दुरध्वनी क्र.020-26123371 E-Mail- homebranchpune@gmail.com

वाचा :-१) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005
२) महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951
३) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम 1897

*********************************************************************************

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,
जिल्हाधिकारी कार्यालय पुणे,
क्र.जि.आ.व्य/कोरोना विषाणू/ 151 /2020.
पुणे, दिनांक :- 22/03/2020.

विषय :- **पुणे** ग्रामीण **जिल्हयात** फौजदारी दंड प्रक्रीया संहीता 1973 चे कलम 144 (1) (3) प्रमाणे दिनांक २२/३/२०२० रोजी रात्री 21.00 वाजलेपासून ते दिनांक २३/३/२०२० रोजी पहाटे 05.00 वाजेचे दरम्यान संचारास मनाई आदेश

## आदेश

**ज्याअर्थी** , जागतीक आरोग्य संघटनेने कोरोना विषाणूमुळे पसरत असलेला आजार हा साथीचा संसर्गजन्य आजार म्हणून घोषीत केला आहे. तसेच कोरोना विषाणूचा प्रसार भारतात व महाराष्ट्रातील पुणे जिल्हयामध्ये गतीने पसरत आहे असे दिसून येत आहे. तसेच राज्य शासनाने कोरोना विषाणूचा ( कोवीड-19 ) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा 1897 हा दिनांक 13/3/2020 पासून लागू करुन खंड 2,3 व 4 मधील तरतुदीनुसार अधिसुचना निर्गमित केली आहे. भारत सरकार आरोग्य मंत्रालय व महाराष्ट्र सरकार आरोग्य मंत्रालय यांनी जाहिर केलेप्रमाणे कोरोनाग्रस्त रुग्णाच्या संर्पकात लोकांनी येऊ नये. तसेच सार्वजनिक किंवा खाजगी जागेत पाच किंवा पाच पेक्षा अधीक व्यक्तीनी एकत्र येणे थांबणे , चर्चा करणे काही कार्यक्रमाचे आयोजन केल्यास कोरोना विषाणूचा संसर्ग व प्रार्दुभाव पसरण्याची शक्यता लक्षात घेता मानवी जीवीताला, आरोग्याला किंवा सुरक्षीततेला संकट उत्पन्न होऊ शकते अशी माझी खात्री झालेली आहे. त्या अनुषंगाने सारासार विचार करुन तातडीची प्रतिबंधक उपाय योजना करणेसाठी फौजदारी दंड प्रक्रिया संहिता कलम १४४ खालील तरतुदीच्या अनुषंगाने स्थानिक निवासी, अभ्यागत, वारंवार कामानीमीत्त, पुण्यात प्रवेश करणारे यांना उद्देशून आदेश काढणे आवश्यक असलेबाबत माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी, **मी नवल किशोर राम, जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हाधीकारी, पुणे फौजदारी दंड प्रक्रीया संहीता १९७३ चे कलम १४४ (१) (३) अन्वये कोणत्याही व्यक्तीला पुणे ग्रामीण जिल्ह्याचे कार्यक्षेत्रातील कोणत्याही रस्त्यावर, सार्वजनीक वाहतुकीने रस्त्यावर, गल्लोगल्ली इ. ठिकाणी संचार, वाहतूक, फिरणे, उभे राहणे, थांबून राहणे, रेंगाळणे या सर्व कृत्य मनाई करणारा आदेश दिनांक २२/०३/२०२० चे २१.०० ते दिनांक २३/०३/२०२० चे ०५.०० दरम्यान लागू करीत आहे.**

Scanned by CamScanner

सदर आदेश पोलीस, आरोग्य,अत्यावश्यक सेवा (उदा. वीज, पाणी पुरवठा, संपर्क, माहीती व तंत्रज्ञान सेवा, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील महत्त्वाच्या पायाभूत विकासासाठी संबंधीत उद्योग – सीएनआय ), अत्यावश्यक वस्तू व सेवा यांची वाहतूक, कोरोना विषाणुचा संसर्ग व प्रसार टाळणेसाठी कार्यरत संबंधीत आपत्ती निवारण व्यवस्थापन यामधील अधीकारी व कर्मचारी तसेच माझ्या वतीने परवानगी दिलेल्या व्यक्ती यांना लागू नसतील. मात्र त्यांनी त्यासाठी त्यांचे ओळखपत्र व सदर विशेष कार्यासाठी नेमणुकीचे आदेश सोबत बाळगणे बंधनकारक असेल.

सदर आदेश माझ्या सही शिक्क्यानिशी दिनांक 22/3/2020 रोजी दिलेला आहे.

(नवल किशोर राम)
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे

प्रति,

1. मा.विभागीय आयुक्त पुणे
2. आयुक्त पुणे महानगरपालिका / पिंपरी चिंचवड महानगरपालिका/ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पुणे
3. पोलीस आयुक्त पुणे शहर / पिंपरी चिंचवड ./ पोलीस अधिक्षक पुणे ग्रामीण यांचेकडे माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रषित

Scanned by CamScanner